Smt. P.D. Hinduja Trust's
K.P.B. HINDUJA COLLEGE OF COMMERCE
Sindhi Linguistic Minority Institution: (Autonomous)
(Affiliated to University of Mumbai) : NAAC Re-Accredited With "A+" Grade: CGPA: 3.59
Current Address (Temporary): Sadhana House, 570, Pandurang Budhkar Marg,
Behind Mahindra Towers, Worli, Mumbai – 400018. Contact Details Tel: 022-4098-9000.
Email: info@hindujacollege.Com : Website: www.hindujacollege.edu.in

Prin. Dr. Navin M. Punjabi **Ref. No. :**

अभिजात मराठी भाषा दिन

स्थळ: हिंदुजा महाविद्यालय
आयोजक: मराठी वाङ्मय मंडळ
कार्यक्रम: अभिजात मराठी भाषा दिन
दिनांक: ३ ऑक्टोबर २०२६

मराठी वाङ्मय मंडळाच्या वतीने मराठी भाषेचे वैभव, समृद्ध परंपरा आणि सांस्कृतिक वारसा जपण्याच्या उद्देशाने महाविद्यालयात 'अभिजात मराठी भाषा दिन' उत्साहात साजरा करण्यात आला.

कार्यक्रमाची सुरुवात अथर्वी चव्हाण आणि वैदेही चव्हाण यांच्या सूत्रसंचालनाने झाली. अथर्वी चव्हाण यांनी उपस्थित मान्यवर, प्राध्यापकवर्ग आणि विद्यार्थी मित्र-मैत्रिणींचे स्वागत केले. त्यानंतर महाराष्ट्राचे राज्यगीत 'गर्जा महाराष्ट्र' सादर करण्यात आले.

कार्यक्रमाच्या मुख्य विषयाला अनुसरून 'मराठी भाषेचा प्रवास' या विषयावर माहितीपूर्ण भाषण सादर करण्यात आले. 'गजानना श्री गणराया' हे गीत अंजली नायर हिने सादर करून कार्यक्रमात सांस्कृतिक रंग भरला.

यानंतर श्रद्धा मुणगेकर मॅडम आणि अर्चना अंचलवार यांनी आपापली मनोगते व्यक्त केली. तसेच उपस्थित इतर प्राध्यापक आणि शिक्षकांनीही मराठी भाषेचे महत्त्व, तिची समृद्ध परंपरा आणि अभिजात भाषेचा दर्जा याबद्दल आपले विचार मांडले.

कार्यक्रमात विद्यार्थ्यांचा सहभाग वाढवण्यासाठी 'मराठी म्हणी ओळखा' हा मनोरंजक खेळ घेण्यात आला. अथर्वी चव्हाण यांनी खेळाची सुरुवात केली. म्हणीचा एक भाग सांगण्यात येत होता आणि प्रेक्षकांनी त्याचा उर्वरित भाग ओळखायचा होता. या उपक्रमामुळे कार्यक्रमात उत्साह आणि आनंदाचे वातावरण निर्माण झाले.

यानंतर 'लाभले आम्हास भाग्य बोलतो मराठी' हे मराठी गीत सादर करण्यात आले. कार्यक्रमाच्या शेवटी आभारप्रदर्शन करण्यात आले आणि त्यानंतर सर्वांनी उभे राहून राष्ट्रगीताचा सन्मान केला.

संपूर्ण कार्यक्रमाचे नियोजन आणि व्यवस्थापन सुरळीतपणे पार पडले. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनामध्ये वरद घोरपडे यांचे विशेष योगदान राहिले. एकूणच, अभिजात मराठी भाषा दिनाचा हा कार्यक्रम मराठी भाषेची गोडी, अभिमान आणि सांस्कृतिक जाणीव निर्माण करणारा ठरला.